सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**सांस्कृतिक कार्य संचालनालय**

**भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत**
**शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान**

---

भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान या योजनेतंर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी सहाय्यक अनुदान देण्यासाठी शास्त्रीय संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या पात्र संस्थांकडून कोकण, नाशिक , पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महसूल विभागातून अर्ज मागविण्यात येत आहेत.

विहित नमुन्यातील अर्ज व नियम www.mahasanskruti.org या संकेतस्थळावर – **नवीन संदेश** या शीर्षकाखाली उपलब्ध आहेत. संस्थांनी अर्ज सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई. ४०० ०३२ या पत्त्यावर पाठवावेत. अर्ज दि. ३ ऑगस्ट, २०२३ ते १ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून भरलेले अर्ज त्याच कालावधीत स्विकारले जातील.

**सही/-**
**संचालक, सांस्कृतिक कार्य**

## अर्जाचा नमुना

**प्रति,**

संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
१ ला मजला, जुने सचिवालय,
विस्तार भवन, एम.जी.रोड, मुंबई-३२

भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत हा अर्ज सादर करीत आहोत. या योजनेशी संबंधीत नियमावली आम्ही वाचली असून त्यातील अटी/शर्ती आम्हाला पूर्णत: मान्य आहेत. या योजनेअंतर्गत सहाय्यक अनुदान प्राप्त होण्यासाठी आम्ही अर्ज करीत असून खालीलप्रमाणे संस्थेची व तिच्या कार्यालयाची संक्षिप्त माहिती तसेच त्यासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडत आहोत.

| अ.क्र. | बाब | संस्थेची माहिती |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक, ई-मेल तसेच वेबसाईट असल्यास त्याबाबतची माहिती | |
| २. | संस्थेच्या स्थापनेचे वर्ष | |
| ३. | संस्था नोंदणी अधिनियम/सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणी क्रमांक (संस्थेच्या नोंदणीच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे) | |
| ४. | संस्थेचे कार्यक्षेत्र (शहरी/ग्रामीण/औद्योगिक/आदिवासी) | |
| ५. | संस्थेचे शास्त्रीय संगीतातील कार्याचे उद्दीष्ट (सादरीकरण/जतन/संवर्धन) | |
| ६. | मागील ३ वर्षात संस्थेने शास्त्रीय संगीत क्षेत्रात कोणत्या स्वरुपाचे कार्य केले आहे त्याबाबत थोडक्यात माहिती (संस्थेने केलेल्या कार्यांबाबत जोडावयाची कागदपत्रे ही खालील टिपमधील माहितीनुसार देण्यात यावी.) | |
| ७. | संस्थेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत कोणते? संस्थेच्या जमा व खर्च लेख्यांची सनदी लेखापालाकडून तयार केलेल्या मागील ३ वर्षांच्या आर्थिक लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या प्रती सादर कराव्यात.(यात (अ) नफा तोटा पत्रक (ब) जमा खर्च लेखे (क) ताळेबंद (ड) सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेल्या खर्चाच्या बाबींचा तपशिल आवश्यक आहे) | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ८. | मागील ३ आर्थिक वर्षात संस्थेने नामांकित अथवा मान्यताप्राप्त स्पर्धेमध्ये मिळविलेल्या उल्लेखनीय यशाची माहिती. (त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे) | |
| ९. | संस्थेने कलाक्षेत्रात राज्य/देश पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची थोडक्यात माहिती (त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे) | |
| १०. | मागील ३ आर्थिक वर्षात केंद्र शासन/राज्य शासन यांच्याकडून कलाक्षेत्रातील कार्याबद्दल निधी मिळाला असल्यास त्याबाबतची माहिती (संबंधीत आदेशाची छायांकित सत्यप्रत) | |
| ११. | संस्थेला अनुदानासाठी पात्र ठरविल्यास बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी संस्थेच्या बँकेचे नाव, ठिकाण, खातेधारकाचे नाव, MICR व IFSC संकेतांक नंबर, पॅनकार्ड नंबर व खातेक्रमांक याबाबतची माहिती | |

**टिप :-** मागील ३ वर्षात संस्थेने शास्त्रीय संगीत क्षेत्रात कोणत्या स्वरुपाचे कार्य केले आहे त्याबाबत माहिती सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे अत्यावश्यक आहे-

1) केलेल्या कार्यक्रमांची मूळ छायाचित्रे (Original Photos) सादर करावीत. छायाचित्रांच्या झेरॉक्स प्रती चालणार नाहीत.

2) संस्थेचे नाव, कार्यक्रमाचे नाव, दिनांक व ठिकाण इ. बाबींचा स्पष्ट उल्लेख असणारा फलक अथवा बॅकड्रॉप कार्यक्रमाच्यामागे लावणे अत्यावश्यक असून कार्यक्रमाच्या मूळ छायाचित्रात सदर फलक असणे आवश्यक आहे.

3) कार्यक्रमाची स्मरणपत्रिका असल्यास त्याची प्रत सादर करावी.

4) कार्यक्रमाबाबत मान्यवरांचे अभिप्राय असल्यास त्याची प्रत सादर करावी.

5) कार्यक्रमाशी संबंधीत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेले वृत्तांत अथवा परिक्षणे (वृत्तपत्राची नाव आणि वृत्तांताचा वार व दिनांकासह)

6) कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिका, हँडबील, कार्यक्रमाच्या जाहिरातीचे कात्रण.

7) प्रयोगात्मक कलेचे जतन व संवर्धन करणाऱ्या संस्थांना वरील अनुक्रमांक १ ते ६ येथील कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नसून त्यांनी केलेल्या कार्याचे मूळ पुरावे शासनास सादर करावेत.

वरील सर्व माहिती व सोबत प्रमाणित केलेली कागदपत्रे खरी आहेत. वरील माहिती व कागदपत्रे खोटी/चुकीची असल्याची आढळल्यास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई होऊ शकते याची आम्हाला कल्पना आहे.

**अध्यक्ष/सचिव**
**नाव, पत्ता व स्वाक्षरी**

## **शास्त्रीय संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना राज्य शासनाचे अनुदान**

सहाय्यक अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या संस्थांनी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत-

1) **संस्था पूर्णत: शास्त्रीय संगीतक्षेत्रात कार्य करणारी असावी.**

2) संस्था नोंदणी अधिनियम आणि सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असली पाहिजे.

3) संस्था या क्षेत्रात किमान १० वर्ष काम करणारी असावी.

4) संस्था शास्त्रीय संगीताचे विविध कार्यक्रम वर्षभर सादर करत असावी.

5) संस्था शास्त्रीय संगीताच्या जतन व संवर्धनाचे काम करत असल्यास त्या संस्थेस अनुदानासाठी प्राधान्य देण्यात येईल.

6) संस्थेच्या दरवर्षीच्या हिशोबाची तपासणी धर्मदाय आयुक्तांनी मान्यता दिलेल्या किंवा संमत्ती दिलेल्या लेखा परिक्षकांकडून किंवा सनदी लेखापालाकडून (चार्टर्ड अकाऊंट) करण्यात यावी. मागील ३ आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या प्रतीत खालील बाबी नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे.
   अ) नफा/तोटा पत्रक
   ब) जमा व खर्च लेखे
   क) ताळेबंद
   ड) सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेल्या खर्चाच्या बाबींचा तपशिल
   इ) सनदी लेखापालांचे लेखा परिक्षणात्मक अहवाल

7) संस्थेस एकदा अनुदान मिळाल्यानंतर पुढील चार वर्ष सदर संस्था अनुदानासाठी पात्र राहणार नाही.

संस्थांनी चुकीची खोटी कागदपत्रे सादर करुन सहाय्यक अनुदान प्राप्त केल्याचे आढळून आल्यास सदर संस्था भविष्यात शासनाच्या अनुदानासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच सदर संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.